# देगलूर महाविद्यालयात संविधान दिन साजरा

देगलूर-येथील देगलूर महाविद्यालय पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्राच्यावतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमास प्रारंभ केला.

या प्रसंगी प्रा. डॉ. दत्ताहरी होनराव राज्यशास्त्र विभाग प्रमुख हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर यांचे भारतीय संविधानाची अधिष्ठाने या विषयावर व्याख्यान झाले.

याप्रसंगी प्रा. डॉ. दत्ताहरी होनराव यांनी आपले विचार मांडताना भारतीय स्वातंत्र्य आंदोलन व त्यातील सर्व घटना, घडामोडी, संविधान सभा हे भारतीय संविधानाची अधिष्ठाने आहेत. भारतीय संविधान हे संविधान सभेच्या अथक परिश्रमाचे फलित आहे. भारतीय शासन व्यवस्था व तिचे स्वरूप संविधानातून स्पष्ट होते. १८५७ पासून ते आजपर्यंत संविधान व लोकशाही शासन व्यवस्थेशी निगडीत अनेक राजकीय, प्रशासकीय घटना व प्रसंगाचा दाखला देत संविधान साक्षरतेची गरज असल्याचे स्पष्ट केले. संविधान निर्मितीचा संपूर्ण इतिहास व त्यातील मुल्यात्मक्ता विशद केली. आदर्श व भारतीय संविधानास अनुरूप नागरिक घडविण्यासाठी संविधान दिन साजरा करावा व त्यातून आजच्या तरुण पिढीला संविधानाची ओळख सर्वच विषयाच्या अभ्यासक्रमातून करून देणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

संविधान दिन हा चारित्र्य संवर्धनाचा उपक्रम आहे. महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. लक्षटे आर. बी. यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्रातील प्रा. डॉ. चोले माधव यांनी केले.

उपस्थितांचे आभार प्रा. सुक्ष्मा भोसले यांनी मानले. या कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयातील पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अधिक संख्येने उपस्थित होते. २६ नोव्हेंबरच्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या भारतीय जवानांना यावेळी श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

Scanned with CamScanner